माजी सैनिकांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण - १०९९/३१३६/प्र. क्र. २७२/९९/२८,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६/११/९९.

वाचा : शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक :
संकीर्ण - १०९७/२४३८/प्र. क्र.'१३४/९७/२८, दि. २४ सप्टेंबर, १९९७.

## परिपत्रक

सैन्य दलात भरती होणारे सैनिक देशाच्या सीमांचे आणि स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करतातच आणि वेळ पडली तर आपल्या प्राणांचे बलिदानही देतात. याचा अनुभव आताच उद्‌भवलेल्या कारगिल युध्दाचेवेळी आपणा सर्वांनाच आला आहे.

त्याचप्रमाणे देशात उद्‌भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थाविषयक समस्या, अतिवृष्टी, वादळे किंवा भूकंपासारख्या आपत्तीस दुर्दैवी नागरिकांच्या सहाय्याला तत्परतेने धावून जावून बहुमोल अशी कामगिरी बजावत असतात. सैन्य दलात भरती झालेले सैनिक त्यांच्या घरापासून आप्तस्वकीयांपासून फार दूर देशाच्या सीमा भागांमध्ये कार्यरत असतात. असे कार्य करीत असताना ते आपल्या खाजगी संपत्तीची कुटुंबाची जबाबदारी गावक यांवर अथवा त्यांच्या कुटुंबातील असलेल्या मुख्य व्यक्तीवर सोपवून सेवेत कार्यरत असतात. सैन्य सेवेतील आपला कर्तव्य कालावधी पूर्ण करुन जेव्हा ते आपल्या मूळ गावी परत येतात, तेव्हा समाजात स्थिर होण्यासाठी त्यांना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांना निरनिराळ्या नागरी सेवेतील प्राधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागते. वेळप्रसंगी त्यासाठी त्यांना अगदी तालुका पातळीवर कार्यालयापर्यंत धाव घ्यावी लागते.

२. माजी सैनिकांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशास विभाग क्र. संकीर्ण - १०९७/२४३८/प्र. क्र. १३४/९७/२८, दि. २४ सप्टेंबर, १९९७ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले असूनदेखील माजी सैनिकांना व त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या समस्या सोडवण्यास नागरी/शासकीय यंत्रणेकडून योग्य सहकार्य मिळत नाही, त्यांची गाऱ्हाणी ऐकण्यात येत नाहीत वा त्यात टाळाटाळ करण्यात येते आणि त्यांना काही वेळा अपमानास्पद वागणूक तसेच त्यांचे काम करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचाराचा अवलंब करण्यात येतो, अशा तक्रारी अद्यापही शासनाकडे येत असतात.

३. मातृभूमीच्या संरक्षणासाठी सर्वस्व देणाऱ्या माजी सैनिकांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कल्याणकारी व पुनर्वसन योजनासंदर्भात तसेच त्यांच्याकडून काही तक्रारी/विनंती अर्ज प्राप्त झाल्यास नागरी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी माजी सैनिकांना योग्य सहकार्य व मार्गदर्शन करावे. तसेच त्यांना सौजन्याची वागणूक देवून त्यांच्या अडचणी सोडवून त्यांना सुसह्य कसे करता येईल, याची दक्षता घ्यावी. माजी सैनिकांना सन्मानपूर्वक वागणूक देवून त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यात याव्यात. माजी सैनिकांच्या अडी-अडचणी सोडवण्यात कुचराई केल्यास, त्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याचे दिसून आल्यास त्याबद्दल गंभीर दखल घेण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

CS CamScanner

४.  सर्व मंत्रालयीन विभाग व यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभागाध्यक्ष व कार्यालयीन प्रमुख सर्व विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी आणि त्यांच्या अधिपत्याखाली सर्व अधिकारी यांना विनंती करण्यात येते, की वरील सूचना आपल्या अधिपत्याखालील तालुका पातळीपर्यंतच्या कार्यालयांमधील सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यास त्यांना सक्त सूचना द्याव्यात. तसेच माजी सैनिकांच्या अडीअडचणी सोडवण्याच्या दृष्टीने टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची योग्य कार्यवाही गंभीरपणे करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रे. प्र. माहना)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे सचिव.
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
संचालक मा. सै. क. वि. पुणे.
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी.
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई.
* प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
* आयुक्त, निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व पंचायत समित्याचे गटविकास अधिकारी.
सर्व मंत्रालयीन विभाग.
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभागप्रमुख/कार्यालयप्रमुख.
निवड नस्ती
(* पत्राने)

CS CamScanner